# महाराष्ट्रातील संत आणि समाजसुधारकांचे समता, न्यायसंदर्भातील प्रबोधनात्मक मार्गदर्शन विचार

**क्रांती शरद कांबळे,** संशोधक विद्यार्थी, राज्यशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

महाराष्ट्राला ज्या अनेक थोर परंपरा लाभलेल्या आहेत. त्यापैकी एक प्रमुख म्हणजे समता आणि सामाजिक सुधारणेची चळवळ महत्त्वाची आहे. तेराव्या शतकाच्या अखेरपासून संत ज्ञानेश्वरांनी या चळवळीचा महाराष्ट्रामध्ये भक्कम पाया घातला. त्यांच्या प्रेरणेने पुढे संतकवींनी भक्ती चळवळीचा भारतभर प्रचार व प्रसार केला. या चळवळीचा मुख्य हेतू होता. हिंदूधर्म ऐक्य प्रस्थापित करणे व तो निर्माण करण्यासाठी उच्च – नीच, स्पृश्य – अस्पृश्य इ. अंतर्गत विरोध मोडून काढणे आवश्यक होते. वेदकाळापासूनच्या 'सर्व मनुष्यप्राणी एक आहेत.' हया शिकवणीचा आधार घेऊन संतकवींनी सामाजिक सुधारणेला चालना दिली.

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात तर हया चळवळीने प्रबोधन स्वरुप घेतलेल्या अनेक संस्था, समाज चळवळी, सभा हयांची उभारणी झाली. स्त्री शिक्षण, स्त्री मुक्ती, अस्पृश्योध्दार, शोषित व पीडित समाजाचे प्रश्न, ग्रामीण व कुष्ठरोग्यांच्या समस्या, अपंग, जातीभेद इ. समस्यांना वाचा फुटली. महाराष्ट्रातील अनेक संत आणि समाजसुधारकांनी समता आणि सामाजिक न्याय प्रस्थापित करण्यासाठी मोलाचे मार्गदर्शन आणि प्रबोधन केले आहे.

आता विश्वात्मके देवे। येणे वाग्यज्ञ तोषावे।
तोषोने मज दयावे। पसायदान हे।
दुरितांचे तिमिर जावो। विश्व स्वधर्मे सूर्ये पाहो।
जो जे वांछिल तो ते लाहो। प्राणिजात।

पसायदानामध्ये संत ज्ञानेश्वरांनी विश्वातील सर्वांना मानवी हक्काची जाणीव करुन दिली. प्राचीन हिंदूच्या ग्रंथातूनही सामाजिक न्याय हा व्यक्तिच्या आत्म्याचा गुण आहे असे सांगितले आहे.

'आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने।
शब्दांचीच शस्त्रे यत्न करुं।

असे म्हणत संत तुकारामांनी तत्कालीन समाजाला मार्गदर्शन केले, जातिभेदावर टिका केली. श्री विठ्ठलावरची भक्ती प्रकट केली, अध्यासाचे सार सांगितले. देश – काळ – लिंग भेदाच्या पलीकडे त्यांची काव्य प्रतिभा झेपावलेली आपल्याला दिसते.

'विष्णुमय जग वैष्णवाचा धर्म। भेदाभेद – भ्रम अमंगळ।।' या भूमिकेचा त्यांनी सतराव्या शतकात प्रसार केला. सांप्रादायिक अभिनिवेश बाजूला ठेवून ऐक्यभाव, समता प्रस्थापित केली.

संत चोखामेळा हे यादव काळातील नामदेवांच्या संतमेळयातील वारकरी संतकवी होते. ते जातीने मांतग (महार) होते. तत्कालीन सामाजिक विषमतेमुळे चोखोबा होरपळून निघाले ते शुद्र – अतिशुद्र, गावगाडा, समाज जीवन, भौतिक व्यवहार, उच्चनीचता व वर्ण व्यवस्था यांच्या विळख्यात अडकले.

'हीन मज म्हणती देवा। कैसी घडो तुमची सेवा।' असा उपरोधिक प्रश्न ते देवालाच विचारतात. 'का म्हणून आम्ही या यातना सहन करावयाच्या, भगवंताच्या लेखी सर्व त्याचीच लेकरे आहेत. ना, मग असा दुजाभाव का?' असे प्रश्न त्यांच्या मनात निर्माण होऊन ते व्यतिथ होताना दिसतात. संस्कारसंपन्न, संवेदनक्षम, भक्तिप्रवण, आत्मनिष्ठ व्यक्तिमत्त्वाचा चोखोबांच्या रंचनांतून, त्यांच्या आंतरिक वेदनांचे सूर छेडलेले जाणवतात.

'धाव घाली विठू आता। चालू नको मंद। बडवे मज मारिती। ऐसा काही तरी अपराध।।'
'जोहार मायबाप जोहार। तुमच्या महाराचा मी महार।
बहु भुकेला जाहलो। तुमच्या उष्ट्यासाठी आलो।।'

या भारत देशातील यच्चयावत समाज एकमताने चालावा, एकजुटीने वागावा म्हणून ज्या महापुरुषांनी आटोकाट प्रयत्न केले, सर्व सुखी असावेत अशा विचाराने जे आमरण झटले त्यापैकी कबीर हे प्रमुख होत. संत कबीर हे हिंदू—मुसलमान ऐक्याचे मोठे पुरस्कर्ते होते. किंबहुना कबीर हे मानवजातीचे, मानवतेचे पुजारी होते. कुठल्याही प्रकारचा धर्मभेद, पंथभेद यापलीकडे कबीर पोहोचले होते.

संत गाडगे महाराज हे महाराष्ट्रातील एक प्रभावी संत. यांनी रुढी—परंपरा व अंधश्रध्दा विरुध्द किर्तनातून जनजागरण केले. त्यांनी या समाजाला दशसूत्री संदेश दिला आहे तो पुढीलप्रमाणे—

१. भुकेलेल्यांना— अन्न.
२. तहानलेल्यांना — पाण.
३. उघडयानागडयांना — वस्त्र.
४. गरीब मुलामुलींना — शिक्षणासाठी मदत.
५. बेघरांना — आसरा.
६. अंध, पंगु, रोग यांना— औषधोपचार.
७. बेकारांना— आसरा.
८. पशु, पक्षी, मुक्या प्राण्यांना — अभय.
९. गरीब तरुण — तरुणींचे — लग्न.
१०. दु:खी व निराशांना — हिंमत.

तुकडोजी महाराज म्हणजे महाराष्ट्रातील एक आधुनिक संत, भक्त, कवी व समाजसुधारक. तुकडोजी महाराजांचे कवित्व अस्सल आहे. “ कीर्तने व खंजिरी भजने यांच्या माध्यमातून समाजसेवा” हेच तुकडोजींचे ध्येय होते. त्यासाठी परंपरागत अनिष्ट रुढी, जातिधर्मपंथभेद, अधश्रध्दा इ. समाजघातक गोष्टींवर कठोर प्रहार करुन ईश्वराचे विशुध्द स्वरुप त्यांनी लोकांसमोर मांडले. सर्व सामान्य लोकांच्या मनावर शिक्षणाचे महत्त्व बिंबवणारे, अस्पृश्यता गाडून टाका असे सांगणारे, स्वच्छतेचे महत्त्व अधोरेखित करणारे, सर्व धर्मकांड सारख्याच नजरेनं पहा असे सांगणारे संत म्हणजे तुकडोजी महाराज. ईश्वरभक्ती, सद्‌गुणांचा उपदेश, सामाजिक जागृती हे विषय त्यांनी आपल्या कीर्तनांतून हाताळले, म्हणूनच त्यांना जनतेने ‘राष्ट्रसंत’ अशी उपाधी देऊन गौरविले.

एकोणिसाव्या शतकात भारतीयांची पाश्चात्य संस्कृतीशी ओळख झाली. व्यक्तिस्वातंत्र्य, समता, सामाजिक न्याय, बुध्दिप्रामाण्य, औदयोगिकीकरण ही या पाश्चात्य संस्कृतीची वैशिष्टये होती. या मूल्यांच्या संदर्भात भारतातील विचारवंतांनी, भारतीय संस्कृती व समाजरचना यांचा पुनर्विचार करण्यास सुरुवात केली आणि विविध सुधारणा चळवळीचा उदय झाला.

महात्मा फुले, न्या. म. गो. रानडे, आगरकर, लोकहितवादी, शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कर्वे या महाराष्ट्रातील समाजसुधारकांनी आयुष्यभर समाजसेवा करुन समता व सामाजिक न्याय प्रस्तापित करण्याचा प्रयत्न केला.

गोपाळ हरी देशमख यांना ‘लोकहितवादी’ या नावाने देखील ओळखले जाते. ज्ञानविज्ञान, बुध्दिवाद, समाजसुधारणा विषयक चिंतन करणारे विचारवंत, पुनर्विवाहास प्रोत्साहन, बहुपत्नीकत्व, हुंडा, बालविवाह या अनिष्ट वृत्तींवर टीका आचारांच्या स्तोमावर टीका, समतेवर आधारलेल्या धर्माचा पुरस्कार, बुध्दिप्रामाण्य, काळानुसार धर्मात, चालीरीतीत बदल करावेत, जातीयता नष्ट करावी, स्त्रियांना समान लेखावे हे त्यांच्या विचाराचे सूत्र होते.

गो. ग. आगरकर हे एक बुध्दिप्रामाण्यवादी विचारवंत आणि थोर समाजसुधारक, जिवंतपणी स्वत:ची अत्यंयात्रा पाहणारे समाजसुधारक, बुध्दिवाद, व्यक्तिवाद, समता आणि मानवतावाद या चतु:सूत्रीने त्यांचा सारा सामाजिक विचार व्यापलेला आहे. चातुर्वर्ण्य, जातिसंस्था, अस्पृश्यता, बालविवाह या गोष्टी त्यांना सर्वथैव अमान्य होत्या. समंती विवाह, घटस्फोट, पुनर्विवाह यांचा पुरस्कार केला. जुन्या रुढी आणि परंपरा स्वखुशीने सोडून

दयावयास समाज तयार नसेल, तर त्या कायदयाने नाहीशा कराव्या असे त्यांचे मत होते. 'इष्ट असेल ते बोलणार व साध्य असेल ते करणार', या भूमिकेतून सामाजिक सुधारणांचा कडवा पुरस्कार त्यांनी आमरण चालू ठेवला.

महर्षी धो. के. कर्वे हे आधुनिक भारताचे एक श्रेष्ठ व कर्ते समाजसुधारक होते. आधुनिक सामाजिक सुधारणेच्या इतिहासात व विशेषत: स्त्रीशिक्षण, विधवाविवाह या बाबतीत कर्व्यांनी आपल्या कार्याने, चिकाटीने व ध्येयवादाने एक अपूर्व आदर्श निर्माण केला.

महात्मा फुले हे महाराष्ट्रातील समाजसुधारकांच्या पहिल्या पिढीतील श्रेष्ठ समाजसुधारक आणि विशेषत: समाजातील श्रमजीवी वर्गाच्या शोषणाची व सामाजिक दास्याची मीमांसा करणारा क्रांतिकारक विचारवंत. महात्मा फुले सांगतात, " जर पशुपक्षी वैगेरे प्राण्यात जातिभेद नाही तर मानवी प्राण्यातच तो कोठून असणार,?" तेव्हा मानवी प्राण्यात जातिभेद मुळीच नाही. परंतु प्रत्यक्ष समाज जीवनात जातिभेद इतका पराकेटीला पोहचला होता की, माणूस माणसालाच माणूस म्हणून ओळखायलाच तयार नव्हता.

जातिभेद नष्ट करणे म्हणजे महापाप असे ज्या काळात समजले जायचे त्याच काळात ते महापाप करण्याची जबरदस्त प्रेरणा म. फुले यांना समाजातील अन्यायामुळे झाली. तिचा त्यांनी सतत पाठ पुरावा केला. जातिमत्सराचे बीज खणून काढल्याशिवाय शुद्रातिअतिशुद्रांची सुधारणा होणार नाही याची त्यांना पूर्ण जाणीव होती म्हणून तेच आपल्या जीवनाचे त्यांनी ध्येय कल्पिले होते.

म. फुले यांनी हजारोवर्षे समतेच्या जलसिंचनासाठी आसुसलेल्या, जातीयतेच्या कडक उन्हाने भेगाळलेल्या समाजभूमीत चैतन्य निर्माण केले. स्वत:च समतेचा संदेश अहर्निश जपत साऱ्या जनमानसात पसरविण्याचा चंग बांधला. तळागाळातील लोकांना शिक्षण मिळावे यासाठी त्यांनी आयुष्यातील महत्त्वाच्या वर्षाचा होम केला. 'शेतकऱ्यांचा आसूड' या ग्रंथात शिक्षणाचे महत्त्व त्यांनी पुढील शब्दात स्पष्ट केले –

विदयेविना मती गेली। मतीविना नीती गेली।
नितीविना गती गेली। गतीविना वित गेले।
वित्तविना शुद्र खचले। इतके अनर्थ एका
अविदयेने केले।

म. फुले यांना ही सामाजिक विषमता हा जातिभेद मुळीच मान्य नव्हता. विषमता मग ती जन्मजात असो की कर्मजात त्यांनी त्याज्य ठरविली. एकता, समानता हाच त्यांच्या तत्त्वज्ञानाचा गाभा होता. 'मानवतावाद' हा त्यांचा जीवनध्यास होता. विश्वमानवाची त्यांची वृत्ती होती. ज्या ब्राम्हणांचा ते द्वेष करीत असे म्हटले जाते. त्याच ब्राम्हणांच्या मुलींनसाठी शाळा काढल्या, कोंडीत सापडलेल्या स्त्रियांना बालहत्या प्रतिबंध गृह काढून जणू पुनर्जन्माचा वरदहस्त त्यांच्या माथ्यावर ठेवला. ब्राम्हण स्त्रियांच्या ललाटी रेखलेला केशवपनाचा आलेख पुसून टाकण्यासाठी नाभिकांकडून संप घडवून आणला. स्पृश्य, अस्पृश्य, शुद्र, अतिशुद्र सर्वांच्या उन्नतीसाठी शेवटच्या थेंबापर्यंत जीवन ज्योत जागती ठेवली. ते फुले जातीयवादी होतील तरी कसे?

राजर्षी शाहू महाराज हे कोल्हापूर या संस्थानाचे अधिपती होते. ते एक प्रजावत्सल, दलितबंधू, समतेचा पुरस्कर्ते, अभ्युदयाविषयी सर्वांगीण दृष्टी असलेले, 'मोडेन पण वाकणार नाही' अशा निधडया वृत्तीचे आणि कर्ते समाजसुधारक होते.

शाहू महाराजांनी समाजातील असमानता दूर करण्यासाठी अस्पृश्योध्दाराचे कार्य खूप मोलाचे ठरले आहे. गंगाराम कांबळे या नोकरास 'सत्य सुधारक हॉटेल' कोल्हापूरातील रहदारीच्या रस्त्यावर काढून दिले. अस्पृश्यांना त्यांनी पैलवान बनविले. त्यांना ते 'जाट पैलवान' म्हणत. चांभारांना ते 'सरदार' तर भंग्यांना 'पंडीत' म्हणत. अस्पृश्यांना ते 'सूर्यवंशी' म्हणून संबोधतात. १ ऑगस्ट १९१८ महार, मांग, रामोशी व बेरड यांची हजेरी हुकुमाने बंद केली. ७ ऑक्टोबर १९०१ रोजी 'राजवाडयातील सर्व धार्मिक विधी वेदोक्त पध्दतीने करावेत' असा हुकूम काढला. १९०१ साली पंचगंगेचा घाट त्यांनी सर्व जाती

धर्माच्या लोकांना खुला केला. १९०१ ते १९११ निरनिराळया जातींतील विदयार्थ्यांसाठी वसतिगृहांची निर्मिती केली. ६ जुलै १९०२ मागास जातींना नोकरीत ५० टक्के जागा राखीव ठेवण्याची घोषणा केली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे एक थोर भारतीय पुढारी, अस्पृश्यांचे नेते व भारतीय संविधानाचे शिल्पकार होते. उच्चविदयाविभूषित असूनही अस्पृश्य जीतीत जन्माला आल्यामुळे त्यांना आयुष्यात फार अपमान सोसावे लागले. शेवटी त्यांनी अस्पृश्यांना उध्द्राराची व त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायांचे निर्मूलन करण्याची प्रतिज्ञा केली. आपल्या प्रतिज्ञेला अनुसरुन त्यांनी स्वत:ला अस्पृश्योध्दाराच्या कामी सर्वस्वी वाहून घेतेले.

डॉ. बाबासाहेबांना सर्व गोरगरीबांची प्रगती साधावयाची होती. सर्वांना समान संधी उपलब्ध करुन दयावयाची होती. त्यासाठी युगानुयुगे समाजाच्या तळागाळातील माणसांना हात देऊन वर उचलायचे होते. त्यांच्यामते, “सामाजिक न्याय म्हणजे जास्तीत—जास्त लोकांचे जास्तीत जास्त कल्याण होय.” डॉ. आंबेडकर म्हणत असत की, ‘सामान्य माणसाला शिक्षण सुलभ होईल अशी व्यवस्था केली पाहिजे. खालच्या वर्गांना उच्च शिक्षण ही फार खर्चाची बाब होता कामा नये. दुसरी गोष्ट अशी की, खालच्या वर्गाला वरच्या वर्गाच्या पातळीवर आणण्यासाठी त्यांना सवलती दिल्या पाहिजे.

महाडच्या चवदार तळयावर सत्याग्रह करण्याचा डॉ. बाबासाहेबांचा निर्णय महाराष्ट्रभर पसरला. मार्च १९२७ ला महाड येथील चवदार तळयातील पाणी सर्व लोकांना मिळावे यासाठी सत्याग्रह केला. मार्च १९३० मध्ये नाशिक येथे अस्पृश्यांना मदिर प्रवेशासाठी काळाराम मंदिर सत्याग्रह केला. १९३२ मध्ये पुणे करारावर सही अस्पृश्यांना स्वतंत्र मतदार संघाऐवजी संयुक्त मतदार संघ मिळाले. सप्टेंबर १९४६ मध्ये अस्पृश्यांच्या हिताच्या दृष्टीने घटना समिती व स्वातंत्र्य जाहीर होईपर्यंत हंगामी सरकारमध्ये योग्य तजवीज करावी म्हणून इंग्लंडला प्रयाण केले.

देशातील सर्व नागरिकांना समान वागणूक, संधी मिळावी. वंश, जात, धर्म, स्त्री किंवा पुरुष यांवर आधारित भेद होऊ नये, म्हणून भारतीय राज्यघटनेत सर्वांना आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय क्षेत्रात विकास घडवून आणण्यासाठी समान अधिकार प्राप्त करुन देण्यात आले आहेत.

महाराष्ट्रातील अशा अनेक संत आणि समाजसुधारकांनी समाजात ‘सामाजिक न्याय’ प्रस्तावित करण्याचा जितक्या शर्थीने प्रयत्न केला. समाजातील अन्यायी रुढी—परंपरेवर तोफा डागल्या, जातिभेद नष्ट करण्याचे प्रयत्न केले ते अवसान त्यांच्या अनुयायात उरलेच नाही. ज्या दृष्ट रुढींना समाजसुधारकांनी मूठमाती देऊ पाहात होते त्या त्यांच्या अनुयायांना त्यांच्या तत्त्वांचा विसरच पडला. अंबाबाईचे नाव घेत जोगवा मागावा तसे त्यांच्या अनुयायांनी त्यांच्या नावावर सत्तास्वार्थ तेवढा साधण्याचा आटापिटा केला.

डॉ. केतकर म्हणतात, “जाती नाहीशा करणे आजच्या जनतेच्या हातात नाही. जातीभावना नाहीशा करणे त्याहूनही त्यांच्या शक्तिबाहेरचे आहे. जात आहे तोपर्यंत तिच्याविषयी भावनाही असणारच.” आज विटाळ, चंडाळ मानणे जरी कायदेशीर गुन्हा असला तरी तो सार्वजनिक जीवनात, वैयक्तिक जीवनातून तो अजून हद्दपार झालेला नाही. आणि आजही सत्तेचे राजकारण फुले, शाहू आणि आंबेडकर यांचे गोडवे गात असले तरी त्यांच्या तत्त्वांचा बोजा राखण्यासाठी नव्हे तर स्थान बळकट करण्यासाठी.”

संदर्भ सूची :

१. मिरजकर शामसुंदर, समजवादी आरक्षण, नागनालंदा प्रकाशन, इस्लामपूर, २००६.
२. पवार दया, डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ.
३. पवार जयसिंगराव, राजश्री शाहू महाराज ग्रंथ, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
४. लोकसत्ता व महाराष्ट्र टाइम्स .
५. www.maharashtra.gov.in
६. www.socialjustic.gov.in